**ARTHA**
( Fortnightly )
**Poona 4**
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, ७ जुले, १९७१ | अंक १३



### सडपातळ होण्यासाठीं आहार कसा असावा ?

फाजील लठ्ठपणा हा आरोग्यास घातक असतो. मेदवृद्धीमुळे अनेक रोगांच्या प्रादुर्भावाला वाव मिळतो ह्याबद्दल वैद्यकीय तज्ज्ञांचे एकमत आढळून येते. अंगावर वाढलेली फाजील चरबी कमी करण्यासाठी अनेक पद्धतींची आहारनियंत्रणे सुचविण्यात येतात. अमेरिकेंत तर अशा आहारपद्धती सुचविण्याची जणू काही स्पर्धाच लागलेली आहे. अमेरिकेतील लोक बहुधा फार खाऊन सुटलेले असल्याने तेथे वजन घटविण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वजन घटविण्यासाठी अगदी सोपा मार्ग मात्र उपलब्ध नाही. ह्या विषयासंबंधी अमेरिकेतील एका आहार-शास्त्रज्ञाने धोक्याचा इषारा दिला आहे. तो म्हणतो की आहार-नियंत्रणाचे काही कार्यक्रम उपयुक्त ठरण्याऐवजी उलटच परिणाम होण्याचा संभव असतो. आहारातील कर्बयुक्त पदार्थांचे प्रमाण वाजवीपेक्षा कमी झाल्यास प्रथिनांचा नाश होतो आणि दर दिवशी एक चतुर्थांश किलोग्रॅम इतके वजन कमी होते. पण वजनात एकदम अशी घट होणे चांगले नाही. त्यापासून अपाय होण्याचाच संभव अधिक. वजन घटवून सडपातळ होण्यासाठी अगदी तंतोतंत बरोबर आहार सांगणे कठीण आहे. तथापि, ज्या आहारात ३० टक्के चरबी, १५ टक्के प्रथिने आणि ५५ टक्के कर्बयुक्त पदार्थ असतील तो आहार योग्य समजला पाहिजे. ह्याचा अर्थ असा की वजन कमी करू इच्छिणाऱ्यांनीही आहार समतोलच राखला पाहिजे. दररोज १,२०० कॅलरी उष्णता देणारा आहार साधारणपणे पुरतो. लंघन मात्र वैद्यकीय निरीक्षणा-खालीच करावे.

---

### २० हजारांवरील शेतीच्या उत्पन्नावर कर बसवा

कलकत्ता येथील मर्चंटस चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांना एक निवेदन सादर केले आहे. निवेदनात दरसाल २० हजार रुपयांपेक्षा अधिक असलेल्या शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तिकर बसविण्याची सूचना करण्यात आली आहे. जरूर पडल्यास घटनेची दुरुस्ती करण्यासही मागे-पुढे पाहू नये, असे चेंबरचे म्हणणे आहे. निवेदन म्हणते की गेल्या काही वर्षांत देशाचा योजनाबद्ध विकास करण्यात आला असून त्याचा फायदा औद्योगिक विभागापेक्षा शेतीच्या विभागाला अधिक झाला आहे आणि ग्रामीण भागांची भरभराट होऊन तेथे मुबलक पैसा खेळू लागला आहे. काही राज्यांत शेतीच्या उत्पन्नावर कर घेण्यात येत असला तरी तो फारच अल्प प्रमाणात आकारण्यात येतो. उलट, काही राज्यांत राजकीय धोरणामुळे शेतसारा आणि आणि कर ह्यात कपातच करण्यात आली आहे. ग्रामीण व मागासलेल्या भागांत उद्योगधंदे रोजगारी वाढविणारे असतील तर त्यांना करात सवलत देण्यात यावी.

---


# ओगले

## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी (जि. सातारा)



बँकेतील नोकरीसाठी बँकिंग विषयाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळवा.

## बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स

नवीन बॅच सोमवार दि. १२ जुलैपासून सुरू होईल.

मुदत : १ महिने. मर्यादित प्रवेश

वेळ : सकाळी ८ ते ९-३०

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार, जिजामाता बागेसमोर, पुणे २.

टे. नं. ५४९६०

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ जुलै, १९७१





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


### उच्च शिक्षितांना नोकऱ्या देण्याची सरकारी धडपड

शिक्षणाचे ध्येय काय असावे ह्याबद्दल भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फारशी चर्चा झाली नाही. शिक्षणाचा गाडा मागील पानावरून पुढच्या पानावर तसाच गडगडत राहिला. काव्यनाटकादी विषय घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या पदवीधरांना परतंत्र भारतात थोडाफार वाव होता. नंतर हळूहळू अशा उच्च शिक्षितांचा आर्थिक व्यवहारात फारसा उपयोग नाही असे दिसून आले. मग हाकाटी सुरू झाली ती तांत्रिक शिक्षणाच्या प्रसाराची. त्यातही इंजिनिअर्स, शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांना विशेष भाव आला. पण हाही काळ लवकरच इतिहासजमा झाला आणि उच्च शिक्षितांना देशात वाव मिळत नाही म्हणून अनेक जण परदेशात जाऊ लागले. त्यालाच चालू वृत्तपत्रीय भाषेत ‘बुद्धिमंतांची निर्यात’ असे म्हणण्यात येऊ लागले. आता अमेरिकेसारख्या प्रगत देशातही खुद्द त्यांच्याच देशातील इंजिनिअर्स बेकार होत राहिले आहेत. तेव्हा परदेशी इंजिनिअरांची त्यांना गरज नाही हे उघडच झाले. दरम्यान भारतामधील बेकार इंजिनिअरांना नोकऱ्या देण्यासाठी गृहमंत्रालयाने एक विभाग खोलून प्रश्न सोडविण्याची खटपट चालविली आहे. चौथ्या आणि पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात हाती घ्यावयाच्या विकासाच्या कामांची पाहणी करण्याच्या कामावर त्यांना नेमण्यात येत आहे. परिणामी ३,७०० इंजिनिअर्सना काम मिळाले आहे. मध्यवर्ती शिक्षण खात्याने प्रत्यक्ष उद्योगधंद्यांतील कामकाजाचा अनुभव इंजिनिअर्सना मिळावा म्हणून एक योजना कार्यवाहीत आणली आहे. त्यात काहीजण सामावले गेले आहेत. त्याशिवाय मध्यवर्ती सरकारची खाती आणि सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटना यांतून १२,००० इंजिनिअरांना काम मिळाले आहे.

### मायदेशी परत येण्यास नाखूष

तथापि, उच्च शिक्षितांत केवळ एंजिनिअर्सच मोडतात असे नव्हे. त्याच्याशिवाय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ ह्यांचीही नोकरीअभावी परवड झालेली आहे. ह्या लोकांनी आपल्या ज्ञानाचा व कर्तृत्वाचा फायदा परदेशांना देत राहाण्याऐवजी भारतात परतावे असे आवाहन भारत सरकारने केले होते. परंतु त्याला मिळालेला प्रतिसाद निराशाजनक आहे. बुद्धिमंतांच्या परदेश प्रयाणामुळे सचिंत झाल्यामुळे सरकारने सुमारे ८५० उच्च शिक्षितांना मायदेशी परतण्याची विनंती केली होती. त्यात एंजिनिअर्स, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि डॉक्टर्स ह्यांचा समावेश असून ते गेली काही वर्षे परदेशात काम करीत आहेत. त्यांच्यापैकी फक्त ५६ जणांनी मायदेशी परत येण्याची इच्छा दर्शविली आहे. तरीसुद्धा त्यातील किती जण खरोखरीच परत येतील हे सांगता येत नाही. बुद्धिमंतांच्या निर्यातीचे स्वरूप अजमाविण्यासाठी सरकारने आता परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती जमविणे सुरू केले आहे. त्यासाठी ४·५ लाख विद्यार्थ्यांनी केलेल्या पासपोर्टांची छाननी करण्यात आली. त्यांपैकी फक्त ४५,००० अर्जदार उच्च शिक्षणासाठी जात होते असे आढळून आले.

---

### “इंजिनिअरांना शहरातच काम हवे, हे त्यांच्या बेकारीचे मुख्य कारण”

इंजिनिअरांमधील बेकारीबद्दल इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) चे अध्यक्ष, श्री. जे. जी. बोधे ह्यांचे विचार उद्बोधक आहेत.—“शहरापासून दूर ठिकाणच्या कामावर जाण्यास इंजिनिअर तयार नसतात; महाराष्ट्र सरकारला ग्रामीण भागात काम करण्यास २०० इंजिनिअर्स हवे होते, पण २० सुद्धा इंजिनिअर्स पुढे आले नाहीत. गुजरातच्या चीफ इंजिनिअरचीही अशीच तक्रार आहे. आफ्रिकेत जाऊन काम करण्यासाठी २६ इंजिनिअर हवे होते; फक्त दोघेजण तेथे जाण्यास तयार झाले. ओरिसातील ग्रामीण भागात नदीवरील पुलाच्या कामासाठी मी दोन इंजिनिअरांना पाठविले, पण तीन महिन्यांतच ते परत आले. कारण, तेथे त्यांना करमेना. मुंबईच्या गिरगाव भागात पूल बांधण्यात यावा, अशी का त्यांची अपेक्षा असते ?”

---

### इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनचे महाराष्ट्राला सर्वांत जास्त कर्ज

इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन ही संघटना देशांतील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भागात उद्योगधंदे काढण्यासाठी कर्ज देत असते. मार्च १९७१ अखेर पुऱ्या झालेल्या तीन वर्षांच्या अवधीत संघटनेने वाटप केलेल्या कर्जातील सर्वांत अधिक हिस्सा महाराष्ट्र राज्याला मिळालेला आहे. संघटनेने ४·०८ कोटी रुपयांची कर्जे मंजूर केली होती. १९७०-७१ अखेर त्यांपैकी ३·७२ कोटी रुपयांची कर्जे प्रत्यक्ष देण्यात आली. वाटप झालेल्या कर्जांपैकी बराच मोठा भाग राज्यांत सुताच्या व साखरेच्या सहकारी गिरण्या व कारखाने काढण्यासाठी वापरण्यात आला.

## पोस्टाच्या थैल्या पळविणाऱ्या अमेरिकन टोळ्या

पूर्व पाकिस्तानात अमानुष अत्याचार करणाऱ्या पश्चिम पाकिस्तानच्या लष्कराला २५ मार्चनंतर अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यात आल्याबद्दल भारताने चिंता व्यक्त केली आहे. ह्याच सुमारास व्हिएटनाममधील युद्धाबद्दलचे गुप्त कागदपत्र अमेरिकेत प्रसिद्ध करण्यात आले. ह्या उघडकीस आलेल्या प्रकारावरून अमेरिकन सरकारबद्दल विपरीत ग्रह उत्पन्न होण्यास भरपूर वाव मिळतो. अमेरिकेतील संघटित गुंडगिरीच्या वार्ता मधूनमधून येत असतात. तेथील गुंडांचे हात किती लांबपर्यंत पोचतील ह्याची कल्पना विमानतळावरून पळविल्या जाणाऱ्या पोस्टाच्या थैल्यांवरून येते. पुष्कळदा अशा थैल्यांतून मूल्यवान वस्तू असतात. त्यावर डल्ला मारून धनिक बनणाऱ्या संघटित टोळ्या विमानतळांच्या आसपास वावरत असतात असे दिसते. अशा एका टोळीचा अलीकडे तपास लागला आहे. अमेरिकेतील विमानतळावरून ह्या टोळीने १० कोटी डॉलर्स अथवा ७५ कोटी रुपयांचा माल लांबविला असे आढळून आले आहे. थैल्यांतील पैसे, माल अगर मूल्यवान चीजवस्तू लांबविण्याच्या प्रयत्नात टोळीच्या हाती भलत्याच अनपेक्षित गोष्टी मिळाल्या असे त्यांतील पकडलेल्या एका भामट्याने कबूल केले. अमेरिकेच्या संरक्षण खात्याची काही महत्त्वाची कागदपत्रे थैल्यांतून आढळली. त्यांची विक्री करून पैसा मिळविता आला असता पण तेवढा धीर भामट्यांना झाला नाही. गुप्त स्वरूपाच्या ह्या कागदपत्रांत जमिनीवरून हवेत प्रक्षेपण करावयाच्या अस्त्राविषयी माहिती होती. भामट्यांनी कागदपत्र जाळून टाकले अगर फेकून दिले.

---

## याह्याखानाने लढाई जिंकली पण युद्ध हरले

पश्चिम पाकिस्तानच्या लष्कराने अनन्वित अत्याचार करून बांगला देशातील संघटित निमलष्करी प्रतिकार मोडून काढला आहे. ह्याचा अर्थ तेथील परिस्थितीवर कायमची पकड बसविण्यात याह्याखानाला यश आले आहे असे मात्र नाही. तेथे मुलकी शासन चालू करण्याचा प्रश्न अतिशय अवघड आहे. अवामी लीगने राष्ट्रीय विधिमंडळातील १६७ जागा डिसेंबरमध्ये घेण्यात आलेल्या निवडणुकीत जिंकल्या होत्या. लष्कराच्या दडपशाहीतून त्यांतील १३० सभासद बचावले आहेत आणि त्यांनी शेख मजिबूर रहमान ह्यांच्याशीच एकनिष्ठ राहण्याचे ठरवले आहे. पूर्वीच्या मुलकी शासनातील ७० टक्के अधिकारीही सुरक्षित आहेत. त्यांची निष्ठाही शेखसाहेबांशीच निगडित आहे. सर्वस्वी नवी मुलकी शासनयंत्रणा उभारणे पाकिस्तानला शक्य होणार नाही. पूर्व बंगालमधील गनिमी लढवय्ये पाकिस्तानी लष्कराला सतावीत आहेत. पूर्व बंगालची भारताशी २,५०० मैल लांबीची सरहद्द आहे व ह्या सीमेवर ३९५ लष्करी नाकी आहेत. त्यांपैकी २१२ पश्चिम बंगालच्या सरहद्दीवर, १०१ आसाम-मेघालय सीमेवर आणि ८२ त्रिपुराच्या सरहद्दीवर आहेत. ह्या नाक्यांचे रक्षण करण्यासाठीच पाकिस्तानला १२,००० फौज गुंतवावी लागेल. मुलकी राजवटीच्या अभावी पूर्व बंगालच्या २३ जिल्ह्यांवर लष्कराची हुकमत ठेवावी लागली तर किती अफाट लष्कर लागेल ह्याची कल्पनाच करवत नाही. पूर्व बंगालचा विस्तार ५५,१३४ चौरस मैलांवर पसरलेला आहे. इतक्या विस्तीर्ण प्रदेशावर कायमची लष्करी सत्ता चालविणे अशक्यप्राय आहे.

---

## अविकसित देशांना निसर्ग भ्रष्ट करण्यामुळे धोका

अनिर्बंध औद्योगीकरणामुळे हवा, पाणी, समुद्र, इत्यादी दूषित होत चालले आहेत. निसर्गातील समतोल बिघडवून तो भ्रष्ट करण्यामुळे उत्पन्न होणाऱ्या आपत्तीची जाणीव प्रगत देशांना झाली आहे. आपत्ती येऊ नये म्हणून अगर आल्यास सह्य करण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. ह्या विषयाचा विचार करण्यासाठी स्विट्झरलंडमध्ये २७ देशांतील तज्ज्ञांची परिषद भरली होती. दोन आठवडे चाललेल्या ह्या परिषदेच्या अखेर असा निष्कर्ष काढण्यात आला की निसर्ग भ्रष्ट करण्यामुळे उत्पन्न होणारा धोका विकसित देशांप्रमाणेच विकसनशील देशांनाही जाणवणार आहे. परिषदेत ह्या विषयाचा ऊहापोह करताना हिंदी कमिटीचे अध्यक्ष श्री. पितांबर पंत म्हणाले की विकसित देश ह्यासंबंधी जे उपाय योजतील त्यामुळे विकसनशील देशांवरही परिणाम होणार आहे. निसर्गाच्या भ्रष्टाकारामुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांवर परिणाम होईल. आपल्या देशांतील निसर्गाचा समतोल बिघडू न देण्यासाठी प्रगत देश जे उपाय योजतील त्यांमुळे जगातील साधनसंपत्ती मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू होईल. एरव्ही ही साधनसामग्री विकासासाठी वापरता येईल. निसर्ग दूषित होण्याचा प्रकार मुख्यतः नव्या कृत्रिम पदार्थांमुळे उद्भवतो. प्रगत देशांनी त्यांचे उत्पादन नियंत्रित करून नैसर्गिक पदार्थांची आयात करण्याचे ठरविल्यास विकसनशील देशांना आपली निर्यात वाढविण्याच्या अधिक संधी उपलब्ध होऊ शकतील.

---

## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे बिझिनेस मॅनेजर श्री. बेनाडीकर ह्यांचा परदेशदौरा

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चे बिझिनेस मॅनेजर, श्री. व्ही. व्ही. बेनाडीकर, हे दि. २० जून १९७१ रोजी रशिया, बल्गेरिया, जर्मन डेमॉक्रॅटिक रिपब्लिक आणि लेबेनॉन ह्या देशांकडे तीन आठवड्यांच्या व्यावसायिक दौऱ्यासाठी रवाना झाले. पहिल्या तीन देशांत ते सर्जिकल, पोस्ट मॉर्टेम, घरगुती आणि औद्योगिक रबर ग्लोव्हज, ऑइल सिल्स, मोटारींचे रबरी भाग, रबर व पीव्हीसी वेलिंग्टन बूट, सँडल्स व हायप्रेशर होजेस यांच्या ऑर्डरी मिळवतील. लेबेनॉनमध्ये इतर आनुषंगिक उत्पादनांच्या बाजारपेठेची पाहणी करतील.

---

स्वस्तिक

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्सचे चेअरमन

# श्री. शंतनुराव किर्लोस्कर

## यांचे अध्यक्षीय निवेदन

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. ची २३ वी वार्षिक साधारण सभा शनिवार दि. २६ जून १९७१ रोजी कंपनीच्या रजिस्टर्ड कचेरीत खडकी, पुणे-३ येथे भरली होती. त्यावेळी चेअरमन श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी केलेले निवेदन.

सभासद बंधुभगिनींनो,

आपल्या कंपनीच्या या २३ व्या वार्षिक साधारण सभेस आपणा सर्वांचे अगत्यपूर्वक स्वागत करण्यास मला विशेष आनंद वाटत आहे.

३१ डिसेंबर १९७० अखेरीचा संचालक मंडळाचा अहवाल व हिशेबाची पत्रके आपणाकडे पाठविली ती आपणास मिळाली असतीलच. आपण ती सर्व वाचलेली आहेत असे मी आपल्या परवानगीने गृहित धरतो.



कंपनीने १९६९ चे पेक्षा १९७० मध्ये अधिक चांगली कामगिरी बजावलेली आहे असे वार्षिक ताळेबंदावरून समजून घेण्यात आपणास आनंद वाटला असेल अशी माझी खात्री आहे. विक्रीचा आकडा गेल्या वर्षी ५·१५ कोटी रु. होता तो १९७० मध्ये ६·०४ कोटी रु. झाला. ही वाढ समाधानकारकच आहे. घसाऱ्यासाठी ४३·६३ लक्षांची तरतूद करून (१९६९ मध्ये ३९·८७ लक्ष रु.) करपात्र नफा २२·१८ लक्ष रु. झाला. कंपनीने ७६·९३ लक्ष रु. ची निर्गत करून आपले निर्गतीचे मान कायम राखण्यात यश मिळविले आहे.

नैसर्गिक रबर व रसायने यांसारख्या कच्च्या मालाचा पुरवठा आंतरराष्ट्रीय बाजारातील प्रचलित किंमतीस येथे होत नसल्याने, निर्यात-उत्पादन क्षेत्रात निर्माण होणारी परिस्थिती गेली तीन वर्षे मी आपणापुढे मांडीत आहे. प्रगतिशील आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये आपल्या कंपनीने मालाचा दर्जा उत्कृष्ट असल्याची प्रशंसात्मक प्रतिष्ठा मिळविली आहे. तथापि तेथे किंमतीच्या बाबतीत अतिशय तीव्र स्पर्धेस तोंड द्यावे लागत आहे. या परिस्थितीचा विचार करता, देशातच उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालाच्या अवास्तव भारी किंमतीमुळे निर्माण होणारे प्रश्न सरकारने विचारात घेऊन ते तातडीने सोडविणे आवश्यक आहे. महत्त्वाचा कच्चा माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील प्रचलित दराने येथे उपलब्ध करून आणि पुरेसे रोख आर्थिक उत्तेजन देऊन, निर्गतीमध्ये होणारा तोटा पुष्कळसा भरून काढण्याची व्यवस्था सरकारने करावयास हवी. या दोन प्रकारांनी साहाय्य मिळाल्यास आपली कंपनी चालू वर्षी एक कोटी रु. पेक्षाही अधिक विक्री निर्यात क्षेत्रात करू शकेल अशी माझी खात्री आहे. त्यासाठी आवश्यक त्या ऑर्डरी कंपनीच्या हातात आहेत. ह्या प्रश्नाकडे मध्यवर्ती सरकारने बारकाईने लक्ष आता तरी द्यावे आणि आवश्यक ते विवेकपूर्ण निर्णय तडफेने घ्यावे, असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. नोकरशाही पद्धतीने निर्णय घेण्यात फार विलंब लागतो, त्यामुळे निर्यात बाजारपेठेस मोठ्या प्रमाणावर मुकण्याची पाळी येते. निर्यातीच्या व्यवहारासाठी सातत्याची प्रयत्नशीलता आणि कल्पकता ह्यांची आवश्यकता असते, पण तिला हा विलंब बाधक होतो.

आपल्या चिंचवड पादत्राण विभागामधील तांत्रिक आणि उत्पादनविषयक बहुतेक सर्व अडचणी कंपनीने निवारण केल्या असून ह्या विभागाच्याबाबत अपेक्षा पुऱ्या होऊ लागल्या आहेत हे नमूद करण्यास मला आनंद वाटतो. अहवालाचे साली नाशिक येथील पी. व्ही. सी. पादत्राणांच्या विभागाने उत्पादनास प्रारंभ केला. पादत्राण शाखेच्या विक्रीस भक्कम पाया प्राप्त करून देण्यासाठी आपल्या कंपनीने रीटेल विक्रीच्या दुकानांची संख्या वाढविण्याचे ठरविले आहे. सध्या अशा रीटेल दुकानांची संख्या २२ असून ती देशभर विखुरलेली आहेत आणि येत्या काही वर्षांत त्यांची संख्या अनेक पटीने वाढविण्याचा आमचा विचार आहे.

आपल्या कंपनीत दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. विलीन होणार आहे हे आपणास माहीत आहेच. विलिनीकरणाच्या योजनेस दोनही कंपन्यांच्या भागधारकांनी एकमताने मान्यता दिली असून हायकोर्टाची अंतिम मंजुरी मिळाल्यावर विलिनीकरणाची योजना कार्यवाहीत येईल. ह्या विलिनीकरणामुळे आपल्या कंपनीच्या स्वतःच्या भांडवलात भरीव वाढ होणार आहे. महाराष्ट्रातील पैसे गुंतविणाऱ्या जनतेत आपल्या कंपनीने निर्माण केलेल्या विश्वासाची ह्यावरून कल्पना येते. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या भागधारकांपैकी २,५५,६०० भाग धारण करणाऱ्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त भागधारकांनी बँकेच्या भागांचे पोटी

रोखीने भरपाई मिळविण्याचा हक्क बजावला नाही आणि आपल्या कंपनीचे भाग व कर्जरोखे घेणे त्यांना पसंत पडले. ह्या जादा रकमेचा विनियोग आपल्या कंपनीच्या विस्तार योजनांच्या कार्यवाहीसाठी करण्यात येईल.

सर्वसाधारणपणे हिंदी रबर उद्योगाचे भवितव्य उज्ज्वल दिसते आणि आपल्या कंपनीचे भवितव्य विशेषच उज्ज्वल वाटते. कामगार तंटे आणि इतर अनेक बाबी ह्यामुळे १९६९ व १९७० ह्या वर्षी रबर उद्योगाची प्रगती खुंटली होती आणि वाढीची गती ४ टक्क्यांवर उतरली होती. ह्या परिस्थितीत झपाट्याने फरक पडत आहे आणि येत्या दहा वर्षांत वाढीची सरासरी गती पुनः वाढीस लागून ती ११ टक्क्यांपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. ह्याच्याशी तुलना करता, आपल्या कंपनीने १७ टक्के वाढ करून दाखविली आहे, ह्याचा आपणास अभिमान वाटेल. वेगवेगळ्या रबरी मालाच्या मागणीमधील वाढीची तपशीलवार छाननी करूनच हा आशादायी अंदाज करण्यात आलेला आहे.

भारतातील दर माणशी पादत्राणांचा खप ०·४६ जोड्या एवढाच आहे. अमेरिकेत तो ४·००, ग्रेटब्रिटनमध्ये २·२ आणि जपानमध्ये २·७ एवढा आहे. भारताची लोकसंख्या दरसाल २ टक्क्यांनी वाढेल आणि खाणींच्या व रासायनिक उद्योगांतून काम करणारांसाठी संरक्षणात्मक पादत्राणांची गरज वाढत जाईल ह्या अंदाजाने पादत्राणांचे उत्पादक वार्षिक ७ टक्के वाढीची गती येती १० वर्षे अनुभविण्यास येईल अशी अपेक्षा करीत आहेत. ह्या संदर्भात प्लॅस्टिक्सचा पादत्राण उद्योगावर होणारा वाढता परिणाम आवर्जून सांगायला हवा.

रासायनिक स्थैर्य आणि शेतीच्या उत्पादनात वाढ ह्यामुळे आर्थिक प्रगतीस गती प्राप्त होईल आणि त्यामुळे उपभोग्य जिनसांची मागणीही वाढेल अशी अपेक्षा आहे. रबर उद्योगाच्या वाढीस ही घटना खूपच पोषक ठरणारी होईल. अनुकूल परिस्थितीचा फायदा आपल्या कंपनीस मिळाल्याखेरीज राहणार नाही.

कंपनीचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स श्री. व्ही. एस्. वैद्य आणि श्री. जी. एस्. वैद्य ह्यांनी कंपनीची जी बहुमोल सेवा बजाविली आहे त्याबद्दल मी व्यक्त करीत असणाऱ्या भावनात आपण सहभागी व्हाल ह्याची मला पूर्ण खात्री आहे. त्यांच्या तज्ञ आणि कुशल मार्गदर्शनाखाली कंपनीने स्वतःच्या गिऱ्हाइकांत आणि गुंतवणूक करणाऱ्या जनतेत उत्कृष्ट लौकिक कमाविला आहे.

कंपनीच्या प्रगतीस स्वतःच्या मेहनतीने आणि कर्तव्यनिष्ठेने हातभार लावल्याबद्दल प्रत्येक कर्मचाऱ्यास मी स्वतःच्या आणि संचालकांच्या वतीने धन्यवाद देतो. पुढील काळातही त्यांनी असेच करीत रहावे असे मी त्यांना आवाहन करतो. आमच्या कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि आत्मीयता हेच आपले खरे बळ आहे.

आपण सर्व भागधारक, त्याचप्रमाणे सर्व ठेवीदार आणि बहुमोल गिऱ्हाइक ह्यांनी माझ्यावर आणि संचालक मंडळातील माझ्या सहकाऱ्यांवर जो विश्वास ठेवला आणि सतत आपुलकी आणि सहकार्य दिले ह्याबद्दल मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

मी आपले पुनः आभार मानतो.

**सूचना :** वार्षिक साधारणसभेच्या कामकाजाच्या वृत्तान्ताचा हा भाग आहे, असे येथे उद्देशित नाही.

(-मूळ इंग्रजीवरून)

### पोस्ट-तार खात्याच्या उत्पन्नापैकी ४८% उत्पन्न टेलिफोन्सचे. इतर शाखा तोट्यात; टेलिफोन्सला २५·४ कोटी रुपये नफा

भारतात ३१ मार्च १९७० रोजी १,०४,९५५ पोस्ट ऑफिसे होती. (स्वातंत्र्य-प्राप्तीच्या वेळी त्यांची संख्या फक्त २२,११६ होती.) त्यांपैकी ९८,८४१ कचेऱ्या ग्रामीण भागात आणि १०,११४ कचेऱ्या शहरी भागात होत्या. त्याखेरीज २,३६,७९५ पत्राच्या पेट्या होत्या.

सर्वांत जास्त पोस्ट कचेऱ्या (१०,९५२) आंध्र प्रदेशात होत्या. महाराष्ट्रात ५,५६७ कचेऱ्या होत्या.

१९६९–७० मध्ये पोस्ट-तार खात्याने ४९० लक्ष तारा पाठविल्या. एकूण तारांपैकी २४% तारा एक्सप्रेस होत्या. परदेशी पाठविलेल्या तारांची संख्या ३४ लक्ष होती. एकूण १·०५ कोटी रेडिओ परवाने देण्यात आले. टेलिव्हिजन परवान्यांची संख्या ४,४९९ भरली.

पोस्ट-तार खात्याला झालेल्या २३३·८ कोटी रु. उत्पन्नापैकी ११०·९ कोटी रु. टेलिफोन शाखेने दिले. १९६९–७० मध्ये पोस्ट ऑफिस शाखेने ५·१ कोटी रु. तोटा दाखविला, तार शाखेने ४·८ कोटी रु. तोटा दाखविला आणि रेडिओ शाखेने ६·३ लक्ष रु. तोटा दाखविला. ह्या उलट, टेलिफोन शाखेने २५·४ कोटी रु. नफा दाखवून पोस्ट-तार खात्यास १५·४ कोटी रु. निव्वळ नफा मिळवून दिला.

### चहाच्या जागतिक उत्पादनात भारताचे स्थान

(हजार टनांत)

| | १९६८ | १९६९ | १९७० |
|---|---|---|---|
| केनिया | ३० | ३६ | ४१ |
| मालानी | १३ | १७ | १९ |
| मोझांबिक | १४ | १६ | १७ |
| युगांडा | १५ | १८ | १८ |
| इतर आफ्रिकन देश | २५ | २७ | २७ |
| एकूण आफ्रिका | १०० | ११४ | १२२ |
| सिलोन | २२५ | २२० | २१२ |
| भारत | ४०२ | ३९६ | ४२० |
| इंडोनेशिया | ८२ | ८१ | ८९ |
| चीन | १६७ | १६९ | १७२ |
| इतर देश | २६९ | २९० | २९८ |
| जागतिक उत्पादन | १,२४५ | १,२७० | १,३१३ |

## उत्पादकता आणि रोजगार ह्यांचा मेळ हवा

### सरकारच्या जाणिवेचे स्वागत : ओगले ग्लास वर्क्स लि. चे चेअरमन श्री शंकरराव ओगले ह्यांचे अध्यक्षीय भाषण

काही दिवसांपूर्वी कामगार परिषदेत पंतप्रधान म्हणाल्या, की औद्योगिक शांतता राखली जाणे हे असंख्य गरीब आणि बेकार तरुणांच्या हिताचेच आहे; उत्पादनाची गती वाढणे हा राष्ट्रीय संवर्धनाचा पाया आहे. ह्या उद्गारांवरून सरकारी विचारसरणीत थोडा बदल झालेला मला आढळतो. रोजगार उत्पादकतेशी निगडित करण्याचे धोरण आखण्याची वेळ आता आलेली आहे, ह्याची सरकारला जाणीव झालेली दिसत आहे.



विकसित देशांच्या समूहात आपणास आपले हक्काचे स्थान प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर आर्थिक प्रगती तातडीने आणि पद्धतशीर व्हायला हवी आणि त्यासाठी मानवी व नैसर्गिक अशा दोन्ही साधनांचा कौशल्याने उपयोग करायला हवा; शिस्तीने आणि सातत्याने कष्ट करायला हवेत.

फक्त संघटित औद्योगिक कामगारांना कायदेशीर व इतर फायदे देत असताना रोजगार नसणाऱ्या इतरांची उपासमार चालू द्यावयाची, ह्यामुळे समतोल रहात नाही. हक्कदार कामगार वर्ग अधिक वेतनासाठी व इतर फायद्यांसाठी एकसारखी चळवळ करीत राहतो. उत्पादकतेपेक्षा किंवा दरदिवशी दरमाणशी उत्पादनापेक्षा रोजगार वाढत गेला म्हणजे बेकारी आणि किंमतवाढ अपरिहार्यपणे निर्माण होतात.

कार्यक्षमता आणि उत्पादनक्षमता ह्यांतील वाढीमुळे निर्माण होणाऱ्या औद्योगिक संपन्नतेत कामगारांना पुरेपूर वाटा मिळाला पाहिजे, असा माझा दीर्घकालीन विश्वास आहे. कामगारांची संख्या वाढवून अधिकाधिक कामगारांना रोजगार देण्यात भूषण मानण्याचा उद्योगपतींचा काळ आता संपलेला आहे; उलट, उत्पादनाच्या खर्चात एकसारखी होणारी वाढ, कामगारांचा आक्रमक पवित्रा, चालकांवर सरकारने कायद्याने घातलेल्या जबाबदाऱ्या, ह्यांमुळे उद्योगपतींना नवा कामगार घेण्यापूर्वी विचारच करावा लागतो.

ह्या कंपनीत कित्येक वर्षे २,००० पेक्षा अधिक कामगार काम करीत आहेत. त्यातील बहुतेक जण ओगलेवाडीच्या आजूबाजूच्या दहा-बारा खेड्यातून येणारे आहेत. ह्या ग्रामीण भागातील कारखान्यामुळे त्यांचे आर्थिक जीवन आणि राहणीचा दर्जा कितीतरी वाढला आहे.

ग्रामीण भागाचे मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरण होत आहे, त्यामुळे हातकंदिलांची मागणी बदलत्या परिस्थितीत कमीकमी होत आहे. सध्याच्याच यंत्रसामुग्रीने, जरूर तेवढ्या यंत्रसामग्रीची भर घालून, नवे कोणते उत्पादन करता येईल ह्याचा संचालकमंडळ काळजीपूर्वक विचार करीत आहे. कंपनीचे प्रमुख उत्पादन अधिकारी, श्री. श्याम ओगले ह्याबाबत माहिती मिळवून आवश्यक सामग्री मिळविण्यासाठी युरोपीय देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाशी आणि स्टेट इंडस्ट्रिअल अँड इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. शी ('सिकॉम'शी) विस्ताराच्या कार्यक्रमास द्रव्य पुरविण्याबाबत वाटाघाटी चालू असून दोन्ही संस्थांची प्रतिक्रिया अतिशय उत्साहवर्धक अशीच आहे.

[ कंपनीने गेल्या वर्षी १६५ लक्ष रु. ची विक्री केली. ६% डिव्हिडंड देण्यात आले. मागील वर्षी ते ५% होते. चालू वर्षीच्या पहिल्या पाच महिन्यात उत्पादन १०% वाढले आहे. ]

---

**डेड लेटर ऑफिसने उघडलेली पाकिटे**— रिटर्न्ड लेटर (डेड लेटर) ऑफिसकडे आलेल्या बिगर-पत्ता पाकिटातून १९६९–७० मध्ये एकूण २३ लक्ष रुपयांचे चेक, हुंड्या, तिकिटे, चलनी नोटा, इत्यादी सापडली. ती आत मिळालेल्या पत्त्यावर धाडण्यात आली. दररोज सुमारे ३९२ पत्रे पत्ता न लिहिलेली आढळतात.

**इंडियन एअरलाइन्सला दररोज ५०,००० रु. तोटा**— पाकिस्तानी मुलूख टाळून भारताच्या पूर्व भागाशी दळणवळण ठेवण्यासाठी इंडियन एअरलाइन्सला दररोज ५०,००० रु. तोटा सोसावा लागत आहे.

**औषधनिर्मितीचे परवाने** — भारतात एकूण २,८६८ औषधनिर्मितीचे परवाने देण्यात आले आहेत. त्यांचा उपयोग करणाऱ्या फर्म्समध्ये २०० कोटी रु. चे भांडवल गुंतलेले आहे.

---

**ब्रिटॅनिया बिस्किट** — ब्रिटॅनिया बिस्किट कं. ने गेल्या वर्षी १७·३८ कोटी रु. ची विक्री करून २·१२ कोटी रु. ठोक नफा मिळविला. निव्वळ नफा १·१३ कोटी रु. उरला.

**आशियाई लोकांची कामवृत्ती** — आशियातील बहुसंख्य लोकांच्या वाट्याला कामवृत्ती येत नाही, असा निष्कर्ष सिंगापूर येथील एका प्रमुख डॉक्टराने काढला आहे. प्रेम करण्यास ७७ डिग्री फॅरनहीट (२५ डिग्री सेंटिग्रेड) हे तपमान सर्वांस उत्तम असते, असे त्याचे म्हणणे आहे.

**टाटा ऑइल मिल्सचे मलेशियात पदार्पण** — मलेशियात साबण, वनस्पती, इत्यादींच्या उत्पादनासाठी युनिटाटा कंपनी स्थापन करण्यात आली आहे. ह्या कंपनीच्या भागभांडवलात टाटा कंपनीचा ४०% हिस्सा राहील आणि तो भारतात तयार केलेल्या यंत्रसामग्रीच्या रूपाने दिला जाईल. टाटा कंपनी तांत्रिक तज्ज्ञ सल्ला पुरवील.

### श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी फ्रेम करून ठेवलेली पाच रुपयांची नोट

"किर्लोस्कर मासिकात साहित्य स्वीकारताना लेखक-कवींनाही पैसे दिले पाहिजेत, हे माझ्या मनात आले. मासिकाची सर्व बैठक ही व्यवसाय म्हणून आम्ही आखली. त्यात छपाईचा जसा खर्च तसे जे छापावयाचे ते पुरविणाऱ्यांचाही खर्च हिशेबात धरला. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांची 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' ही कविता 'किर्लोस्कर' मध्ये प्रसिद्ध झाली. 'किर्लोस्कर' ने पाच रुपये मोबदला त्यांना पाठविला. कै. कोल्हटकरांचे पत्र आले, "तुमची पाच रुपयांची नोट फ्रेम करून ठेवली आहे. कवितेला मोबदला मिळेल, असे कधी माझ्या मनातच आले नव्हते."

—श्री. माधव गडकरी ह्यांनी 'साप्ताहिक गोमन्तक' मध्ये श्री. शंकरराव किर्लोस्करांच्या संबंधी लिहिलेल्या लेखातील एक आठवण.

---

### अमली पदार्थांच्या सेवनाबद्दल चिंता

अमेरिकन सरकारला अमली पदार्थांचे सेवन करण्याचे व्यसन अमेरिकेत वाढत चालल्याबद्दल चिंता वाटत आहे. ह्या पदार्थांचा व्यापार मुख्यतः पूर्व आशिआत चालतो. त्यावर नियंत्रणे घालून त्यापासून उत्पन्न होणारा धोका टाळण्यासाठी काय करता येईल ह्याचा विचार करण्यासाठी फिलिपाइन्समध्ये एक परिषद भरविण्यात आली होती. बेकायदेशीरपणे चाललेल्या ह्या व्यापाराला पायबंद घालण्याच्या दृष्टीने अमेरिका आशिआतील देशांचे सहकार्य मिळवू इच्छित आहे. खुद्द अमेरिकेतील तरुणांत मादक पदार्थांची चटक वाढत आहेच. पण अशा पदार्थांच्या सेवनाने व्हिएटनाममध्ये लढणाऱ्या अमेरिकन लष्करावरही आपला पगडा बसविला आहे. मादक पदार्थांच्या सेवनाने अमेरिकन लष्करातील जवान दुर्बळ होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे.

---

### रेशमाच्या किड्यांसाठी प्लॅस्टिकची घरे

बंगलोर येथील रेशीम उत्पादन आणि संशोधन संघटनेचे प्रतिनिधीमंडळ अलीकडेच रशिआला भेट देऊन आले. सोव्हिएट शास्त्रज्ञांनी रेशमाच्या किड्यांची पैदास करण्यासाठी नवीन तंत्र शोधून काढल्याची माहिती मंडळाला मिळाली आहे. किड्यांची पैदास करण्यासाठी रशिआने विशिष्ट प्रकारची प्लॅस्टिकची घरे बनविली आहेत. ती वापरल्यामुळे मनुष्यबळाची गरज लागत नाही आणि कोषांचे उत्पादनही वाढते. रशिआतील सामुदायिक शेतांतून नव्या पैदास घरांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करण्यात येणार आहे. ह्या नव्या संशोधनामुळे रेशमाच्या उत्पादनाच्या बाबतीत अगदी नवीन दिशा उपलब्ध झाल्या आहेत. रेशमाच्या कोषांच्या उत्पादनाचे उद्दिष्ट रशिआने गाठले आहे.

---


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १: २६०३०६ नं. २: २९०००६

## दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

### राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांत भक्कम जामदारखाने

राष्ट्रीयीकरण झालेल्या १४ बँकांच्या आवारात भक्कम जामदारखाने बांधण्यात येणार आहेत. त्यांचे कामकाज पाहण्यासाठी नोटा व नाणी हाताळण्याचा अनुभव असणारे खास अधिकारी नेमण्यात येणार आहेत. जामदारखाने बांधून झाले की बँकांवरील व रिझर्व्ह बँकेवरील ताण कमी होण्यास मदत होईल. सध्या बँकांना आपल्याजवळचा शिलकी पैसा दररोज रिझर्व्ह बँकेच्या जामदारखान्यांत भरावा लागतो. नवीन जामदारखाने बांधून झाल्यावर बँकांना आपल्या आवारातच पैसा हाताळता येईल. ह्यासंबंधीच्या दैनंदिन नोंदी रिझर्व्ह बँकेचा अधिकारी मधून मधून तपासत जाईल आणि त्या बरोबर असल्याची खात्री करून घेईल. नवीन जामदारखाने बँकांच्या शहरातील मुख्य कचेरीच्या आवारात उभारण्यात यावयाचे आहेत. सध्या सरकारी आणि ट्रेझरी बिलांचे काम स्टेट बँक ऑफ इंडिआ करीत असते. त्यांपैकी काही काम राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांकडे कमी-जास्त प्रमाणात सोपविण्यात येणार आहे. त्यामुळे स्टेट बँकेवरील कामाचा ताण तर कमी होईलच; पण शिवाय खेडोपाडी पसरलेल्या बँकांनाही आपले काम करणे अधिक सुलभ होईल. दरम्यान बिल्स आणि चेक्स ह्यांच्या साह्याने होणारे व्यवहार सुकर करण्यासाठी इंडिअन बँक्स असोसिएशन एक व्यवस्थित पद्धत तयार करीत आहे. त्यासाठी खास निरोप्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. सध्या ही व्यवस्था जी पाच केंद्रे रात्रीच्या टपाल विमानाने जोडली गेलेली आहेत, त्यांच्यापुरतीच मर्यादित ठेवण्यात येणार आहे.

### पाकिस्तानला विटलेला पत्रकार

अँथनी मॅस्कारेन्स ह्या नावाचा एक पत्रकार कराची येथील मॉर्निंग न्यूजमध्ये वार्ताहर म्हणून काम करीत असे. पाकिस्तानमधील हत्याकांडाचे वर्णन करणारे त्याचे वार्तापत्र अलीकडे लंडनमधील सन्डे टाइम्समध्ये प्रसिद्ध करण्यात आले. १९६५ सालच्या भारत-पाक युद्धात त्याला स्थानबद्ध करण्यात आले होते. त्यावेळी तो दिल्लीत काम करीत होता. एक महिन्यापूर्वी त्याने पाकिस्तानच्या बांगला देशातील कारवाईचे समर्थन केले होते. पण, लष्करी अधिकाऱ्यांच्या दडपणामुळे त्याला तसे करावे लागले. आता तो पाकिस्तान सोडून मुलाबाळांसह ब्रिटनला गेला आहे.

### दोन रुपयांच्या नोटा अप्रिय

व्यवहारात असणाऱ्या चलनी नोटांबद्दल लोकांचे काय ग्रह आहेत ह्यासंबंधी रिझर्व्ह बँक लक्ष ठेवून असते. लोकांच्या आवडीनिवडी ध्यानात घेऊन नव्या नोटा छापण्याच्या वेळी सल्ला देण्यास ह्या उपक्रमाची मदत होते. रिझर्व्ह बँकेच्या निरीक्षकांना असे आढळून आले आहे की १०० रुपयांची नोट सर्वांनाच हवीहवीशी वाटते. त्यातल्या त्यात उद्योगपती व व्यापारी हे १०० च्या नोटांवर खूष असतात. कारण, त्यांना फार मोठ्या संख्येने नोटा हाताळाव्या लागतात. मार्च १९७० अखेर ४,२४८ कोटी रुपयांच्या नोटा फिरत होत्या. त्यांपैकी ४६.६ टक्के नोटा १०० रुपयांच्या होत्या. १० रुपयांच्या नोटांची टक्केवारी ३४.५ इतकी होती आणि लोकप्रियतेत त्यांचा क्रमांक दुसरा होता. सर्वांत अप्रिय नोट २ रुपयांची होती. २ रुपयांच्या नोटा १.५ टक्के होत्या. १९५१ मध्ये ह्या नोटांची टक्केवारी १.९ टक्के होती.

### कमी केलेल्या धर्मोपदेशकाला बनावट नोटा प्रकरणात अटक

केरळ आणि तामीळनाडू पोलिसांनी बनावट १०० रुपयेवाल्या नोटांचे प्रकरणातील धागेदोरे उकलले आहेत. रेव्हरंड फादर जॉर्ज सी. पैकड, ह्या जॅकोबाईट सिरिअन खिस्ती धर्मोपदेशकाला एक आरोपी म्हणून अटक करण्यात आली आहे. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर पुन: विवाह करण्यास असलेली चर्चची बंदी त्याने मोडून दुसरा विवाह केल्याबद्दल त्याला कामावरून कमी करण्यात आलेले होतेच. कोट्टायम जिल्ह्यातील अंतर्गत निर्जन विभागामधील त्याच्या घरी बनावट नोटा तयार करण्याचे काही साहित्य पोलिसांना सापडले, असे ते म्हणतात. त्याचा मेव्हणा बेपत्ता आहे. हे कुटुंब चिट फंड चालवीत असे; त्या फंडाचे दिवाळे निघालेले आहे.

### सूडानकडून कापसाची मोठी खरेदी

सूडान आणि भारत ह्यांच्या दरम्यान कापूस खरेदी करण्याचा करार करण्यात आला आहे. करारातील अटींस अनुसरून येत्या १८ महिन्यांत भारताने कापसाची खरेदी करावयाची आहे. सूडानच्या कापूस बाजारात चालू हंगामात सुमारे ३ लाख, ५० हजार गासड्या कापूस भारताला मिळू शकेल असा अंदाज आहे. भारतात लांब धाग्याचा कापूस पिकविण्याचे प्रयत्न चालू आहेत. ते यशस्वी झाले तरीही काही वर्षे चांगल्या प्रतीच्या परदेशी कापसाची आयात करावी लागणार आहे. अमेरिकेकडून मिळणारा कापूस इतर देशांच्या मानाने महाग पडतो. सूडान-भारत करार हा सूडानने केलेल्या कापसाच्या विक्रीचा सर्वांत मोठा करार आहे.

### ३१ लाख रुपये किमतीचे टेबल

लंडनमधील लिलावगृहात एक ऐतिहासिक टेबल १ लाख, ७३ हजार पौंड अथवा ३१ लाख, १४ हजार रुपयांना विकण्यात आले. मुळात हे टेबल फ्रान्सच्या १६ व्या लुई राजाचे होते. नंतर ते रशिआच्या झारच्या पत्नीच्या ताब्यात आले. १९१८ मध्ये रशिआत कम्युनिस्ट क्रांती झाल्यावर ते नव्या राजवटीच्या मालकीचे झाले. परंतु १९३० साली रशियन सरकारने दुर्लभ असे परदेशीय चलन मिळविण्यासाठी ते विकले. त्या वेळी ते एका अमेरिकन लक्षाधीश बाईने विकत घेतले. ह्या बाईचे यजमान मोटर कारखानदार होते. पतीच्या पश्चात् त्यांनी डेट्राइट येथे एक भव्य प्रासाद बांधला. तो फ्रान्समधील व्हर्सायसारखा होता. त्यांत हे टेबल ठेवण्यात आले होते.

## पाकिस्तानात फक्त ८ टक्के लोक साक्षर

प्रगत देशांतील औद्योगिक समाजरचना ही तेथील शिक्षण-प्रसारावर आधारलेली आहे. त्या देशाच्या अलीकडील इतिहासात तांत्रिक शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आलेले असले तरी त्या शिक्षणाचाही पाया मूळ साक्षरतेवरच आधारलेला असतो. ह्याचाच अर्थ असा की कोणत्याही देशाच्या शिक्षणपद्धतीत साक्षरतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्या दृष्टीने विचार करता पाकिस्तानमधील शिक्षण विषयक परिस्थिती अतिशय निराशाजनक म्हणावी लागेल. त्या देशाच्या जन्मापासूनच त्याला राजकीय अस्थैर्य, आर्थिक संकटे ह्यांना तोंड द्यावे लागले. त्यातच मुसलमान समाजाची रुढीप्रिय चाकोरीची भर होती. त्यामुळे पाकिस्तानच्या बहुजन समाजाच्या शिक्षणावर अतिशय वाईट परिणाम झाला आहे. तज्ज्ञांच्या मताने पाकिस्तानात अवघे ८ टक्केच लोक साक्षर झालेले आहेत. पाकिस्तान लष्करी कारभाऱ्यांच्या ताब्यात गेल्यापासून अंदाजपत्रकांत शिक्षणावर अवघा १ टक्का खर्च करण्यात येत आहे. बांगला देशाची स्वातंत्र्यचळवळ सुरू झाल्यामुळे आता तर शिक्षणावर आणखीच कमी खर्च करण्यात येईल हे उघड आहे. पाकिस्तान लष्करावर ४० टक्के खर्च करीत असे. आता तो ५० टक्क्यांपेक्षाही अधिक झालेला आहे. बांगला देशात ठाण मांडून बसलेले सैन्य व भारताशी होणाऱ्या युद्धाची खरीखोटी प्रचारी भीती ह्याचा परिणाम असा होणे अपरिहार्यच म्हटले पाहिजे.

पूर्व पाकिस्तानातील बंड उद्भवण्यापूर्वीही पाकिस्तानातील शिक्षणाची आस्था असणाऱ्या लोकांना बहुजन समाजाच्या शिक्षणाचे भवितव्य काळेच दिसत होते. तेथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत नव्हते. प्राथमिक शाळांत घेण्यात येणारी अल्प फीही अनेक मोठ्या कुटुंबांना परवडत नव्हती. कारण त्यांची प्राप्तीच जेमतेम संसार भागण्याइतकी होती. त्यातच अलीकडे पाकिस्तान सरकारने काटकसरीचे अनेक उपाय जारी केलेले आहेत. त्यामुळे आयात होणाऱ्या अनेक प्रकारच्या मालाची किंमत २०० टक्क्यांनी वाढली आहे. सरकारच्या नव्या धोरणात पुस्तके चैनीच्या वस्तू ठरविण्यात आल्या आहेत. अर्थातच त्यांच्या किंमती भरमसाट चढल्या आहेत. ह्यात भरीला भर म्हणून मुसलमान समाजाच्या परंपरागत शिक्षणविषयक दृष्टिकोनामुळे मूलभूत अडचण उत्पन्न झाली आहे. कुराण वाचण्याइतके शिक्षण मिळाले म्हणजे पुरे असा हा दृष्टिकोन आहे. पाकिस्तानातील प्रगतिशील शिक्षणतज्ज्ञ व परदेशी शिक्षक ह्यांना अर्थात हा दृष्टिकोन मंजूर नाही. पश्चिम युरोपात ज्या प्रकारचे शिक्षण लोकांना दिले जाते त्याबद्दल पाकिस्तानात संशयाचे वातावरण आहे. अशा प्रकारच्या शिक्षणानेच पूर्व बंगाल उफाळला अशी विचारसरणी तेथे प्रसृत झाली आहे. पाकिस्तानातील लोकसंख्येचे दडपण एकसारखे वाढत चाललेले आहे. अर्थात, दारिद्र्यही फोफावत चालले आहे. त्याचा परिणाम म्हणून प्राथमिक शिक्षणही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. परदेशी शिक्षणतज्ज्ञांच्या मताने प्राथमिक शिक्षणासाठी शाळेत जाणाऱ्या १०० मुलांपैकी अवघी ८ मुलेच जेमतेम ५ वी पर्यंत मजल मारतात.


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

*संस्थापक—कै. प्रा. ग. कृ. भोपटकर ]* *: स्थापना १९१८ :* *[ टेलिफोन नंबर ५४१६०*

नवीन वर्षासाठी गुरुवार, दि. २४ जून, १९७१ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू झाले आहेत.

— महत्त्वाचे अभ्यासक्रम —

(१) गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत : एक वर्ष, किमान पात्रता : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी. विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) प्री-डिग्री आर्ट्स् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

— इतर अभ्यासक्रम —

बी. कॉम्. पार्ट वन् व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

प्रसिद्धि-पत्रक : ५० पैसे

व. द. रिसबूड
बी. ए., डी. कॉम्.
उप-प्राचार्य

अ. ग. भोपटकर
एम्. कॉम्., एलएल्. बी.
प्राचार्य

## ' संपदा ' गो. स. पारखे

### औद्योगिक मान-पारितोषिक रौप्यमहोत्सव अंक

कागद-कारखानदारीतील अग्रगण्य उद्योगपती श्री. म. स. पारखे ह्यांनी आपले धाकटे बंधू कै. गोपाळराव ह्यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून मराठा चेंबरने गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिक योजना सुरू केली. तिला आता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. गोपाळ संशोधक बुद्धीचा व व्यवसाय यशस्वी रीतीने करणारा. तेव्हा महाराष्ट्रात त्याच्यासारखे व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी होत असलेले जे उदयोन्मुख कारखानदार असतील, त्यांना त्यांची गुणवत्ता पाहून गोपाळच्या नावाने मान-पारितोषिके देण्याची योजना आखण्यात आली. प्रारंभी पारितोषिक निधी ६,००० रु. होता. या रौप्यमहोत्सवाच्या शुभप्रसंगी श्री. बाबुराव पारखे व त्यांचे सहकारी ह्यांनी भर घालून ५०,००० रु. चा केला आहे. ह्या पंचवीस वर्षांत एकूण ११२ उद्योन्मुख कारखानदारांना बक्षिसे देण्यात आली. गेल्या २५ वर्षांत भारताची मोठ्या उद्योगधंद्यांप्रमाणेच लघुउद्योग क्षेत्रातही नेत्रदीपक प्रगती झाली आहे. त्याचे प्रतिबिंब पारितोषिक-पात्र झालेल्या वस्तूत दिसते. पारितोषिक मिळविणाऱ्यांपैकी कित्येकांनी भरघोस प्रगती करून यश मिळवले आहे. अशा प्रकारच्या उत्तेजनाची ही योजना भारतात पहिली आहे. सरकारी योजना त्यानंतर कितीतरी वर्षांनी सुरू झाल्या. गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिक योजनेचे श्रेय श्री. बाबुराव पारखे ह्यांना तर आहेच, पण योजनेची कल्पना सुचविणारे मराठा चेंबरचे सेक्रेटरी श्री. आ. रा. भट ह्यांनाही तितक्याच महत्त्वाचे श्रेय दिले पाहिजे. मान-पारितोषिक योजनेच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्ताने काढलेला चेंबरच्या ' संपदे'चा विशेषांक (जून, १९७१) होतकरू कारखानदारांच्या प्रश्नांवर उत्कृष्ट प्रकाश पाडणारा आहे. गेल्या पंचवीस वर्षांतील पारितोषिक विजेत्यांच्या याद्दीत १९४७ सालाचे म्हणजे पहिल्या वर्षाचे विजेते म्हणून श्री. वसंत श्रीधर वैद्य ह्यांचे नाव आढळते. ' लॅटेक्स रबराची खेळणी ' ह्यासाठी स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स, पुणेला पारितोषिक मिळाले होते. आज स्वास्तिकचे वार्षिक उत्पादन ६ कोटी रु. वर आणि निर्गत पाऊण कोटीवर आहे. अशीच अनेक कित्येक उदाहरणे आहेत. ह्यावरून ह्या योजनेने केलेल्या कामगिरीची कल्पना येईल.

---

### मोठ्या कर्जदारांवरील व्याजाचा बोजा वाढणार

हजारी समितीने आपल्या अहवालात कमी पतवाल्या पण लायक कर्जदारांची सोय व्हावी ह्यासाठी त्यांना ८·५% दराने कर्जे मिळावीत; मोठ्या उद्योगधंद्यांना १३% पर्यंत दराने व्याज आकारावे, असे सुचविले आहे. लहान कर्ज मागणारे कमी पतीचे आणि मोठे कर्ज मागणारे जास्त पतीचे, असा ढोबळ फरक समितीने केला आहे. दुसरा कोणताच निकष ह्यापेक्षा अधिक समाधानकारक ठरणार नाही, असे समितीला वाटते. जिंदगी किंवा रोखे ह्यांचे तारणावर कर्ज देताना मार्जिनची अट सौम्य करावी; लायक कर्जदारांचे बाबतीत मार्जिनची आवश्यकताच नसावी, असा समितीचा अभिप्राय आहे. बिगर तारण कर्जात बँकांनी वाढ करावी, दीर्घ मुदतीच्या कर्जाचे बाबतीत पहिली काही वर्षे परतफेडीची आवश्यकता नसावी, असेही समितीचे म्हणणे आहे. समितीचे एक सभासद, डॉ. अशोक मित्रा हे त्याही पुढे गेले आहेत. आपल्या भिन्न मतपत्रिकेत त्यांनी भूमिहीन कामगारांसारख्या पत नसलेल्या कर्जदारांना शून्य ते पाच टक्के दराने कर्ज पुरविले जावे, असे प्रतिपादन केले आहे. किफायतशीर धंदे आणि मळे ह्यांवर १५ ते २० टक्के व्याज आकारण्याची त्यांची शिफारस आहे.

---

**टुथपेस्टऐवजी टुथपावडर वापरा** —ग्लिसरीनच्या तुटवड्यामुळे टुथपेस्टचे उत्पादन घटणार आहे आणि त्यामुळे टुथपेस्ट वापरणारांना दात घासण्यासाठी अन्य साधनांचा उपयोग करावा लागेल असे दिसते.

**बेकारांच्या संख्येत वाढ** —उद्योग विनिमय केंद्रात नोंद झालेल्या रोजगार इच्छुकांची संख्या जानेवारी १९७१ मध्ये ३४·५१ लक्ष होती, ती जानेवारी १९७१ मध्ये ४१·६८ लक्ष झाली. म्हणजे ती २०·८% ने वाढली. त्यांपैकी स्त्रियांची संख्या ४·१६ लक्षांवरून ४·९२ लक्षांवर गेली.

**प्रॉव्हिडंट फंडाची थकबाकी** —मालकवर्गाने यावयाच्या प्रॉव्हिडंट फंडाच्या हिश्शाची थकलेली बाकी जून, १९७० अखेर १५ कोटी रु. वर गेली आहे. कापडगिरण्या आणि इंजिनिअरिंगचे कारखाने यांची थकबाकी अनुक्रम ९·८३ कोटी रु. आणि १·७७ कोटी रु. आहे.

**दरमाणशी उत्पन्नात पंजाब अग्रेसर** – भारताचे दर माणशी सरासरी उत्पन्न ४२३ रु. आहे. पंजाबमध्ये दर माणशी सरासरी उत्पन्न सर्वांत जास्त (६१९ रु.) असून बिहारमध्ये सर्वांत कमी (२९२ रु.) आहे. १९६४-६५ संबंधीचे हे आकडे आहेत.

**सार्वजनिक टेलिफोनला २५ पैसे पडणार** – सार्वजनिक टेलिफोनमधून केलेल्या कॉलला सध्या २० पैसे पडतात, ते लवकरच २५ पैसे पडू लागतील. त्यासाठी सध्याच्या यंत्रात बदल करावा लागेल. त्यामुळे दरवाढ होण्यास वेळ लागेल.

**मंत्र्यांचा जनतेवरील भार** – पगार, भत्ते, सुखसोई, ह्यांचा एकत्रित विचार केला, तर मध्यवर्ती सरकारच्या प्रत्येक मंत्र्याला दरमहा १,००,००० रुपये मिळतात, असा श्री. एम. के. मेहता (स्वतंत्र एम. पी.) ह्यांनी हिशेब केला आहे. "समाजवादाचे ध्येय सांगणाऱ्या पक्षाच्या राज्यात अशी परिस्थिती असणे चमत्कारिक आहे. पंतप्रधानांनी ह्यात लक्ष घालून मंत्र्यांचा मोबदला योग्य मर्यादेत आणावा आणि भारताच्या इतर नागरिकांप्रमाणे तो करपात्र करावा " असे त्यांनी सुचविले आहे.

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं !

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल आता है।

हमारे दूसरे निर्माण हैं : १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड
वर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : ३७६१०२


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)